# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २५/०७/२०२४ (गुरूवार) सकाळ**

---

**अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक**
**वाहनासह एकुण ५,०४,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त**

दि. २४/०७/२०२४ रोजी पोस्टे मौदा येथील स्टाफ पो.स्टे मौदा हद्दीत पेट्रोलिंग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, मौजा मौदा मटन मार्केट जवळ हिरव्या रंगाचा जॉनडीअर कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम. एच— ४०/सी.ए. —४६०३ मध्ये अवैधरीत्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या विश्वसनीय खबर वरून स्टाफचे मदतीने नाकाबंदी करून ट्रॅक्टर क्र. एम. एच— ४०/ सी.ए.—४६०३ चा चालक **आरोपी नामे— रविंद्र जागोबाजी मानकर, वय ४४ वर्ष, रा. वार्ड क्र. ०४ रामनगर मौदा ता. मौदा जि. नागपुर** यास थांबवुन स्टाफने पाहणी केली असता वाहनामध्ये अंदाजे ०१ ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रॅक्टर चालकास ट्रॅक्टर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीच्या ताब्यातून हिरव्या रंगाचा जॉनडीअर कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम.एच ४०/सी.ए.—४६०३ कि. ४,००,०००/—रु व विना नं. प्लेटची ट्रॉली कि. १,००,०००/— रु व त्यामध्ये १ ब्रास अवैध्यरित्या विना परवाना वाहतुक करित असलेली रेती अं. कि. ४,०००/रु असा एकुण ५,०४,०००/— रु चा मुद्देमाल जप्त करून आरोपी नामे— रविंद्र जागोबाजी मानकर वय ४४ रा. वार्ड क्र. ०४ रामनगर मौदा ता. मौदा जि. नागपुर यांचेविरुद्ध पोस्टे मौदा येथे कलम ३०३(२) बी एन एस.२०२३ सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमिन महसुल अधी., कलम ४, २१ खान व खनिज अधि. कलम ३ संपत्ती नुकसान प्रती. कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे मौदा येथील ठाणेदार पोनि सतिशसिंग राजपूत, सपोनि नितेश डोर्लीकर व स्टाफ यांनी पार पाडली.

**रोख व साहित्य चोरी करणाऱ्या आरोपींना कन्हान पोलीसांनी केले अटक**

पोस्टे कन्हान अंतर्गत फिर्यादीचे राहते घरी नाका नं ७ कन्हान येथे दि. २५/०७/२०२४ चे ००.०० वा. ते ०१. ०० वा. दरम्यान यातील **आरोपी १) मयुर सुनिल पुरे वय १९ वर्ष रा. राम नगर कन्हान २) आशिष विजय सिंग ठाकुर वय २७ वर्ष रा. राम नगर कन्हान** यांनी फिर्यादी नामे— मनोहर मारोतराव खेडकर वय ४६ वर्ष रा. मनसर कांद्री माइन्स ता रामटेक ह. मु बाळकृष्ण वाडीभस्मे याचें घरी किरायाने याचे घराचे दरवाजा उघडुन आत प्रवेश करून बॅगमध्ये ठेवलेले नगदी ५००० रू, प्रेस कि. २००० रू, असा एकुन ७००० रू चा माल चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रीपोर्ट वरून पोस्टे कन्हान येथे आरोपींविरूद्ध कलम ३३१(४), ३०५ बि.एन.एस २०२३ अन्वये गुन्हा नोंद केला असुन कन्हान पोलीसांनी आरोपीतांचा शोध घेवुन त्यांना अटक केली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पाहवा गुरूप्रकाश मेश्राम हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर